# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.01.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

- दावोस इथं जागतिक आर्थिक परिषदेसाठी महाराष्ट्राचं दालन सज्ज
- लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या हस्ते 85 व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेचं उद्घाटन
- ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय महिला आणि पुरूष खोखो संघांवर अभिनंदनाचा वर्षाव

  आणि
- ज्येष्ठ प्रवचनकार किसन महाराज साखरे यांचं निधन

**दावोस मुख्यमंत्री**

दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेसाठी महाराष्ट्राचं दालन सज्ज झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल जागतिक आर्थिक मंचाचे संस्थापक अध्यक्ष क्लॉस श्वाब यांची भेट घेतली. या भेटीत स्वच्छ उर्जा, इलेक्ट्रीक वाहनं, अत्याधुनिक उद्योग अशा विविध विषयांवर चर्चा झाली. पुढच्या दोन दिवसात विविध कंपन्याबरोबर महाराष्ट्राचे अनेक सामंजस्य करार होतील अशी अपेक्षा आहे.

**पीठासीन अधिकारी परिषद**

विधीमंडळाच्या माध्यमातून देशातल्या नागरिकांची सेवा करण्याची महत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. बिहारमध्ये पाटणा इथं आयोजित 85 व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत ते काल बोलत होते. भारतीय राज्यघटनेची 75 वर्षे : घटनात्मक मूल्यांच्या बळकटीकरणासाठी संसद आणि राज्य विधान मंडळांचं योगदान, या विषयावर परिषदेत विचारमंथन होत आहे. राज्य विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲडव्होकेट राहुल नार्वेकर यांच्यासह विविध राज्यांच्या विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी या परिषदेत सहभागी झाले आहेत. भारतीय राज्यघटनेमुळेच भारताची जागतिक स्तरावर एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळख झाली आहे, असं राम शिंदे यावेळी म्हणाले.

**पालकमंत्री स्थगिती**

राज्य सरकारनं रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे. मात्र प्रजासत्ताक दिनी या दोन्ही जिल्ह्यांमध्ये त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण होईल, असा शासन निर्णय सरकारनं जारी केला आहे. आदिती तटकरे यांची रायगडच्या आणि गिरीश महाजन यांची नाशिकच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती झाली होती. दरम्यान, पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती दिल्यावरुन विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. तर पालकमंत्री पदावरुन महायुतीमध्ये कुठलेही वाद नसल्याचा दावा सत्ताधाऱ्यांनी केला.

**अत्याधुनि प्रयोगशाळा**

आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत तयार केलेल्या उत्पादनांच्या स्वदेशी प्रणालींच्या चाचणीसाठी बेलापूर इथं एक अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येत आहे. या प्रयोगशाळेचं भूमीपूजन इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांच्या हस्ते काल झालं. आरोग्य, संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, आणि वैद्यकीय क्षेत्रातील स्वदेशी बनावटीची उपकरणं वापरण्याआधी त्यातील सर्व प्रणालीची चाचणी या प्रयोगशाळेत होणार आहे.

**अन्नपूर्णादेवी**

अत्याचारग्रस्त महिलांना आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उदेशानं प्रत्येक जिल्ह्यात सखी वन स्टॉप सेंटर तयार करण्यात आलं आहे असं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री, अन्नपूर्णा देवी यांनी काल सांगितलं. कोल्हापूरमधल्या या केंद्राला भेट देऊन तिथल्या कामाचा आढावा घेतल्यानंतर त्या बोलत होत्या. याबाबत अधिक माहिती देताना अन्नपूर्णा देवी म्हणाल्या..

**महिला आयोग**

मेळघाटमध्ये एका महिलेला मारहाण करून तिची धिंड काढल्या प्रकरणी 5 आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणाकर यांनी दिली आहे. त्या काल पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होत्या. या प्रकरणी समिती स्थापन करून सविस्तर अहवाल आठवडाभरात आयोगाला सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत, असं चाकणकर म्हणाल्या.

**प्रगतिशील शेती**

धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेऊन आपल्या शेतीच्या उत्पन्नात वाढ केली आहे. ऐकुया याबाबतचा वृत्तांत

धाराशिव तालुक्यातील कौडगाव शिवारातील जयंत जगदाळे या शेतकऱ्याने महाराष्ट्र शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा मधून आपल्या शेतात एक एकरवर शेडनेटची उभारणी केली आहे. या शेडनेट मधून त्यांनी मिरची दोडका यासारखी पिकं घेऊन उत्पन्न सुरू केल आहे. यासोबतच त्यांनी आपल्या शेतातील विहिरीवर मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतून पाच अश्वशक्तिचा कृषी पंप देखील घेतला आहे. यासाठी त्यांना 25 हजार रुपये खर्च आला असून 80 टक्के अनुदानातून उभारलेल्या या सोलार युनिट मधून पूर्ण दिवसभर त्यांच्या शेतातील सर्व पिकांना पाणी देण्याची सोय झाली आहे. महाराष्ट्र सरकारच्या या योजनांचा जयंत जगदाळे यांच्यासारख्या शेतकऱ्याने लाभ घेऊन आपल्या शेती उत्पन्नात केलेली वाढ इतर शेतकऱ्यांना निश्चितच प्रेरणादायी आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी देविदास पाठक धारशिव

**खोखो संघ अभिनंदन**

खो-खो च्या पहिल्या विश्वचषकावर भारताचं नाव कोरून ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय महिला आणि पुरूष संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी या संघांचं अभिनंदन केलं आहे. ही विजयश्री अविस्मरणीय आहे. महाराष्ट्राला आपला अभिमान आहे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संघाचं कौतुक केलं आहे. उपमुख्यमंत्री तसंच महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनीही या सर्वांचं अभिनंदन केलं आहे. खोखो संघाच्या यशाविषयी बोलताना महिला संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिने आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या,

पुरुष संघाचा कर्णधार प्रतीक वाईकर म्हणाला,

**पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपी संजय रॉय याला कोलकत्याच्या सत्र न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. राज्य सरकारनं पीडीतेच्या कुटुंबियांना 17 लाख

रुपये नुकसान भरपाई द्यावी असा आदेशही न्यायमूर्ती अनिर्बन दास यांनी दिला आहे. न्यायालयानं गेल्या शनिवारी संजय रॉयला दोषी ठरवलं होतं.

**बदलापूर न्यायालय**

बदलापूर लैंगिक अत्याचार घटनेतला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीत झालेल्या मृत्यूला पाच पोलिस कर्मचारी जबाबदार असल्याचं न्यायालयीन चौकशी अहवालात म्हटलं आहे. हा अहवाल काल मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत पोलिसांनी बळाचा अनावश्यक वापर केल्याचा ठपका ठेवून आरोपीच्या हाताचे ठसे घटनेत वापरलेल्या बंदूकीवर आढळलेले नाहीत असं अहवालात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**युद्ध प्रात्यक्षिक**

अहिल्यानगर इथल्या लष्कराच्या मेकनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल या संस्थेच्या वतीनं काल युद्ध प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. के. के. रेंजवर झालेल्या प्रात्यक्षिकात हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्रं तसंच टी 90 भीष्म, टी 72 अजेय आणि एमबीटी अर्जुन अशा विविध रणगाड्यांचाही समावेश होता. यावेळी नेपाळचे लष्करी अधिकारी आणि भारतीय लष्करातले वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**निधन**

वारकरी संप्रदायाचा चालता बोलता शब्दकोश, वेदांत आणि संत वाङ.मयाचे गाढे अभ्यासक हरी भक्त परायण डॉक्टर किसन महाराज साखरे यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. आज दुपारी आळंदी इथं त्यांच्यावर अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. श्री साखरे महाराज संत परंपरेचे ते उत्तराधिकारी होते. देश परदेशात त्यांचा शिष्य परिवार आहे. राज्य सरकारचा 2018 या वर्षीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार किसन महाराज साखरे यांना प्रदान करण्यात आला आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**